महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.
Web : www.dhepune.gov.in E-mail : scholarshiphd@gmail.com
फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/२०१६-१७/ 10018 दिनांक : १६.८.२०१६ 19 AUG 2016

अत्यंत महत्वाचे

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय : अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०१६-१७ च्या अंमलबजावणीबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बोद्ध, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिक्षणाकरीता केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१६-१७ साठी राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा व त्यासाठी आवश्यक असलेला अर्ज सोईस्करपणे उपलब्ध व्हावा व तो विद्यार्थ्यांना केव्हाही सहजपणे भरता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी ४८३०२ संच निर्धारित केलेले आहेत. **केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी इयत्ता ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ व उच्च शिक्षण घेणाऱ्या (आय टी आय, डिप्लोमा, बी.एड्., पदवी, पदव्युत्तर, एम.फील., पीएच.डी. ईत्यादी) विद्यार्थ्यांसाठी नवीन शिष्यवृत्ती व नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर २०१६ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.** पोस्ट मॅट्रिक अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीची सविस्तर माहिती, अर्ज करण्याची पद्धत, संकेतस्थळ, तसेच इतर अनुषंगिक माहितीबाबत संचालनालयाच्या वतीने दिनांक १० ऑगस्ट २०१६ रोजी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांमधून जाहिरात देऊन त्यास प्रसिद्धी देण्यात आलेली आहे. तसेच सदर जाहिरात या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरसुद्धा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर संकेतस्थळावर केंद्रशासनाकडून प्राप्त झालेल्या **NSP 2.0** पोर्टल बाबतच्या (**Guidelines**) मार्गदर्शक सूचना व वेळोवेळी प्राप्त झालेली इतर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**NSP 2.0** पोर्टल बाबतच्या **Guidelines** काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व महाविद्यालयांना/ विद्यापीठांना कार्यवाही करण्याबाबत सूचित करावे. सहसंचालक कार्यालयांनी देखिल त्यानुसार कार्यवाही करावी. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नविन/सुधारीत प्राप्त होणाऱ्या सूचनांसाठी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळाचे व या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे अवलोकन महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी करण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

सदर (**Guidelines**) मार्गदर्शक सूचनांनुसार महाविद्यालय/विद्यापीठाच्या प्रमुखांनी त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जात नमूद केलेला त्यांचा आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी लिंक केलेला असल्याची खात्री करावी. आधार क्रमांक बँक खात्याशी लिंक केलेला नसेल तर तशा सूचना संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज भरतांना त्यांचा आधार क्रमांक त्यांच्या ज्या बँक खात्याशी लिंक केलेला आहे त्याच बँक खात्याचा क्रमांक अर्जात नमूद करावा अशा सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. महाविद्यालयातील जास्त विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक नसल्यास संबंधित महाविद्यालय/विद्यापीठांनी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक नोंदणी करण्यासाठी कँप आयोजित करावेत. आधार नोंदणी केंद्रांची माहिती UIDAI चे **(http://resident.uidai.net.in)** संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

या मार्गदर्शक सूचनांनुसार रु. ५०,०००/- पेक्षा कमी शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जासोबतची कागदपत्रे महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर जतन करुन ठेवावी व सदर कागदपत्रे काटेकोरपणे तपासून अर्जावर पुढील कार्यवाही करावी. रु. ५०,०००/- पेक्षा जास्त शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जासोबतची कागदपत्रे **NSP 2.0** पोर्टल वर **UPLOAD** करण्यात यावी.

सदर मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांचे प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी करुन अर्जास मंजुरी देण्याची कार्यवाही महाविद्यालयांनी ३० दिवसांत पूर्ण करावी.

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जांची तपासणी करुन मंजूर केलेले पात्र अर्ज प्रमाणित करुन पुढील टप्प्यावर विनाविलंब ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. व सहसंचालक कार्यालयांनी देखिल महाविद्यालयाकडून ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जावर त्वरीत योग्य ती कार्यवाही करुन पात्र अर्ज पुढील टप्प्यावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. **अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी जाहिरातीनुसार अंतिम दिनांकाची वाट पाहू नये.**

केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी निर्धारित केलेले नवीन शिष्यवृत्तीचे संच पूर्ण करण्याची सर्वस्वी जबाबदारी सर्व विभागीय कार्यालयांवर आहे. प्रत्येक विभागास कमीत कमी ५००० व त्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे संच पूर्ण करणे आवश्यक आहे. यासोबत पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीची सन २०१६-१७ ची जाहिरात जोडण्यात येत आहे. सदर जाहिरात महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयाच्या दर्शनी भागात लावण्याबाबत आदेश देण्यात यावेत.

अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती सन २०१६-१७ ही राज्यात यशस्वीपणे राबविण्यासाठी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालय / शैक्षणिक संस्था यांचे प्राचार्य / विभागप्रमुख यांच्या कार्यशाळा, बैठका घेण्यात याव्यात व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ होईल, यासाठी प्रयत्न करावे. विभागामार्फत घेण्यात आलेल्या कार्यशाळा/ बैठका यांचा कार्योत्तर अहवाल या संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक तथा नोडल ऑफिसर
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.